Pune Police

# प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून पुणे स्टेशन परिसरात एका इसमांकडुन एक पिस्टल जप्त

मा. पोलीस आयुक्त श्रीमती रश्मि शुक्ला व मा. पोलीस सह आयुक्त सुनिल रामानंद यांनी अग्निशस्त्र विक्री करणारे व बाळगणाऱ्या लोकांवर कारवाई करण्याच्या सुचना दिल्याने खंडणी विरोधी पथकाचे पोलीस अधिकारी व स्टाफ असे दि. २४/०४/२०१७ रोजी बंडगार्डन पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना खंडणी विरोधी पथकातील पोलीस नाईक सचिन अहीवळे यांना एक इसम पिस्टल व काडतूस घेवुन अलंकार टॉकीज चौक, पुणे स्टेशन येथे आला असल्याची माहिती मिळाल्याने खंडणी विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक सुनील गवळी व विठ्ठल शेलार तसेच खंडणी विरोधी पथकाचे स्टाफने सापळा रचुन इसम नामे शशिकांत गंगाप्पा नाईक वय २३ वर्षे रा. विष्णूकृपा नगर, शिवाजीनगर एस.टी. स्टॅन्डच्या मागे, शिवाजीनगर पुणे याला पकडून त्याचेकडून एक लोखंडी पिस्टल व एक जिवंत काडतूस अशी किं.रुपये २०,१००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले असून सदरबाबत बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक आरोपी याचेवर चंदननगर पोलीस स्टेशन येथे खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे.

**सदरची कारवाई ही मा. दिपक साकोरे प्रभारी अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,पुणे. मा. पी.आर.पाटील पोलीस उप आयुक्त गुन्हे पुणे व मा. सुरेश भोसले सहा. पोलीस आयुक्त गुन्हे-१ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक (अति. कार्य.)सतीश शिंदे व स.पो.नि. सुनील गवळी, विठ्ठल शेलार व स्टाफ सचिन अहीवळे, प्रमोद मगर, किरण चोरगे, शिवानंद बोले, प्रशांत पवार, निलेश देसाई, फिरोज बागवान,मंगेश पवार, वनराज पवार, राजू पवार, कांता बनसुडे, यांनी केली आहे.**